मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# १२६ लाभार्थ्यांच्या सदनिकांची सोडत संपन्न!

## घरकुलच्या माध्यमातून नागरिकांचे घराचे स्वप्न साकार



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी ।** घरकुलच्या माध्यमातून नागरिकांचे घराचे स्वप्न साकार होत असून त्याचा उपयोग योग्य पद्धतीने करावा, आपल्या सदनिकेची स्वच्छता ठेवावी व मिळालेली सदनिका भाड्याने देऊ नये अथवा विक्री करू नये असे आवाहन अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी केले. केंद्र व राज्य शासनाच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने प्राधिकरण सेक्टर क्र. १७ व १९ चिखली येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असून या प्रकल्पातील ३ सोसायट्यांच्या इमारती मधील एकूण १२६ लाभार्थ्यांच्या सदनिकांची संगणकीकृत सोडत प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते काढण्यात आली. या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी श्रीकांत कोळप, कार्यालय अधीक्षक विष्णू भाट, कॉम्प्युटर ऑपरेटर रेवती अडूरकर, लिपिक योगिता जाधव यांच्यासह झोनिपू विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच घरकुल सर्व उपस्थित होते. नियोजित घरकुल सहकारी गृहरचना संस्थासाठी तात्पुरत्या स्वरुपात निवड करण्यात आलेल्या सोसायटी क्र. १५४ इमारत क्र. डी ०९, सोसायटी क्र. १५५ इमारत क्र. डी- ११, सोसायटी क्र. १५६ इमारत क्र. एफ- १५ या सर्व सोसायटी अध्यक्ष यांचे अतिरिक्त आयुक्त जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी लाभार्थींनी आता हक्काचे व स्वतःचे घर मिळाल्याने इमारतीमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण करावे, घराचा वापर स्वतः करावा, इमारती भोवती झाडे लावून त्याचे योग्य प्रकारे निगा राखावी व जतन करावे. महापालिका नागरिकांना सुसज्ज सुविधा देण्यासाठी नेहमीच कार्यरत असते असेही अतिरिक्त आयुक्त जगताप म्हणाले. यावेळी अण्णा बोदडे सहाय्यक आयुक्त यांनी प्रकल्पाची माहिती, घराचा वापर, येणारे देयके व बँकेचे हप्ते वेळेवर भरणेबाबत मार्गदर्शन केले. विशेष अधिकारी किरण गायकवाड म्हणाले, पिंपरी चिंचवड शहर राहण्यास उत्तम शहर आहे अशा शहरात स्वतःचे घर झाले त्यामुळे निश्चित नागरिकांचे जीवनमान उंचावेल.

### दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना

» पालिकेच्या वतीने प्राधिकरण सेक्टर क्र. १७ व १९ चिखली येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असून या प्रकल्पातील ३ सोसायट्यांच्या इमारती मधील एकूण १२६ लाभार्थ्यांच्या सदनिकांची संगणकीकृत सोडत प्रशासक तथा आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या हस्ते काढण्यात आली.

# उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड ही ‘क्रीडानगरी’ होईल!

## पिंपरी-चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा विश्वास



**पिंपरी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड मधील अनेक खेळाडूंनी आतापर्यंत क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी बजावली आहे. शहरामध्ये अनेक शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू आहेत. त्या खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आपल्या शहराची ओळख सातासमुद्रापार घेवून गेले आहेत. त्यामुळे उद्योगनगरी असणारे आपले शहर भविष्यात खेळाडुंसाठी अद्यायावत ‘क्रीडानगरी’ होईल, असा विश्वास भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला. ‘सेव्हन ओशन’ पैकी चार ‘ओशन’ जलतरणद्वारे पार करणाऱ्या सागर किशोर कांबळे याला राज्य सरकारतर्फे ‘शिवछत्रपती पुरस्काराने’ सन्मानित करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सागर कांबळे यांची भेट घेतली. तसेच, त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा नियोहन समितीचे सदस्य काळूराम नढे, आमदार लक्ष्मणभाऊ जगताप कला क्रीडा अकादमीचे अध्यक्ष माऊली जगताप तसेच कांबळे यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. सागर कांबळे यांने जलतरण करताना जगतातील ‘सेव्हन ओशन’ पार करण्याचे ध्येय ठेवले आहे. बंगालची खाडी, इंग्लिश खाडी, कॅटरिना खाडी, दक्षिण आफ्रिकेतील खाडी अशा चार खाड्या पार केल्या असून आगामी काळात सागरच्या वतीने तीन खाड्या पार करण्यात येणार आहेत. या खड्या पार करण्यासाठी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

**“अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत सागरने यशाला गवसणी घातली. हिंमत आणि कष्टाच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते याचीच प्रचिती यातून झाली. त्याचे यश सर्व युवकांना प्रेरणा देणारे आहे. शहरातून अनेक खेळाडू राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचे नाव लौकिक करत आहेत. औद्योगिक आणि आयटी हब अशी ओळख असणारी आपली नगरी आता शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातदेखील अग्रेसर होत आहे. शहरातील खेळाडूंनी आपापल्या आवडत्या खेळात सहभाग घेऊन उत्तुंग यश मिळवावे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहर हे एक शिक्षण आणि क्रीडानगरी म्हणून ओळखली जाईल असा मला विश्वास आहे.**

**– शंकर जगताप,**
**शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड**

# बापानेच केला मुलींच्या अपहरणाचा बनाव!

## सासूकडून दहा लाख मिळविण्यासाठी रचला कट

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सासूच्या जंगम मालमत्तेतील दहा लाख रुपये घेण्यासाठी मुलींच्या अपहरणाचा बनाव रचून फोन करून खंडणी देण्यासाठी दबाव आणणाऱ्या वडिलाला वाकड पोलिसांनी अटक केली. सचिन मोहिते असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी मोहितेची मेव्हणी सारिका कैलास ढसाळ (वय ३८, रा. रहाटणी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सारिका ढसाळ यांची दोन वर्षांची मुलगी आणि मोहितेची १५ वर्षांची मुलगी मंगळवारी सायंकाळी दोघीजणी राखी खरेदी करण्यासाठी बाहेर आल्या होत्या. त्यानंतर त्या बेपत्ता झाल्या असल्याचे पोलिसांना कळले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पथके तयार करून मुलींचा शोध सुरू केला. पोलिसांनी



कुटुंबीयांची चौकशी केली असता मोहितेही हजर होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आपण वाघोली येथून आलो असल्याचे सचिन याने जबाबात सांगितले. पोलिसांनी शेजाऱ्यांकडे चौकशी केली असता, सचिन हा मोटार दुरुस्तीसाठी घेऊन गेल्याचे पोलिसांना सांगितले. त्यामुळे सचिन याच्यावर पोलिसांना संशय बळावला. पोलिसांनी सीसीटिव्ही फुटेजची पाहणी केली असता सचिनच्या मोटारीमध्ये बसून दोन्ही मुली गेल्याचे दिसले. बुधवारी सकाळी पुन्हा पोलीस फिर्यादी यांच्या घरी गेले असता सचिन याच्या पत्नीने पोलिसांना सांगितले की, बहीण सारिका यांचा तीन महिन्यांपूर्वी मोबाईल हरवला होता. त्या नंबरवरून मोहितेला अपहरणकर्त्यांचा फोन आला होता. त्या फोनवरून अपहरणकर्त्यांनी 'तुमच्या मुली सुखरूप पाहिजे असतील, तर पोलिसांना काही न सांगता दहा लाख रुपये द्या, नाहीतर तुमच्या मुलीचे बरेवाईट करेन' अशी धमकी दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास करून मोहिते याचा या प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न केले. त्यानुसार सचिनकडे कसून चौकशी केली असता त्याने हा गुन्हा केल्याचे कबूल केले. सासू पुष्पा अल्हाट यांना भीती दाखवून त्यांच्या जंगम मालमत्तेपैकी दहा लाख रुपये मिळवण्यासाठी हा अपहरणाचा बनाव केल्याचे त्याने सांगितले. दोन्ही मुलींना वाघोली येथील घरी सुरक्षित ठेवले असून, त्या सकाळी दहा वाजता वाघोली येथून निघून मनपा भवन येथे येणार आहेत, असे त्याने सांगितले. त्यामुळे पोलिसांनी मनपा भवन येथे तीन पथके पाठवली. मात्र, प्रवासाला लागणाऱ्या वेळेपेक्षा जास्त वेळ झाला तरीही मुली मनपा भवन येथे पोहोचल्या नाहीत. त्यामुळे पोलिसांना चिंता वाटू लागली. सचिन याने मुलींना ठेवलेल्या जागी जाऊन पोलिसांनी पाहणी केली असता तेथे मुली नव्हत्या. त्यानंतर पोलिसांनी पीएमपीएल प्रशासनाशी समन्वय साधत वाघोली ते मनपा भवन या दरम्यानच्या बसचालक व वाहकांना संपर्क करत मुलींची माहिती घेतली. त्यानंतर दुपारी दीड वाजताच्या सुमारास मुलींना बसमधून ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी सचिन मोहिते याला अटक केली आहे.

### चौकशीदरम्यान मोहिते होता हजर

**» सारिका ढसाळ यांची दोन वर्षांची मुलगी आणि मोहितेची १५ वर्षांची मुलगी मंगळवारी सायंकाळी दोघीजणी राखी खरेदी करण्यासाठी बाहेर आल्या होत्या. त्यानंतर त्या बेपत्ता झाल्या असल्याचे पोलिसांना कळले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पथके तयार करून मुलींचा शोध सुरू केला. पोलिसांनी कुटुंबीयांची चौकशी केली असता मोहितेही हजर होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर आपण वाघोली येथून आलो असल्याचे सचिन याने जबाबात सांगितले.**

# महाराष्ट्र नवनिर्माण जनअधिकार सेना कार्यान्वित!

## पिंपरी चिंचवड शहरात पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पिंपरी चिंचवड शहरांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना अंगीकृत महाराष्ट्र नवनिर्माण जनाधिकार सेना अंगीकृत संघटना आजपासून कार्यान्वित करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, हेमंत संभूस – महाराष्ट्र नवनिर्माण जणाधिकारी सेना महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या आदेशाने, व महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष हेमंत संभूस यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवडचे शहराध्यक्ष



सचिन चिखले यांच्या उपस्थितीत आज दहा जणांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. आज नियुक्तीपत्र देताना हेमंतजी संभूस, महिला सेनेच्या शहराध्यक्ष सीमाताई बेलापूरकर, सचिव रूपेश पटेकर, उपशहराध्यक्ष राजू सावळे, उपविभाग अध्यक्ष अप्पा अलेक्स हे उपस्थित होते. या सर्व नियुक्त्या एक वर्षाच्या कालावधीसाठी असतील. पक्षातील सर्व ध्येयधोरण समोर ठेवून पक्ष वाढीसाठी शहरातील नागरिकांच्या ध्येय धोरणासाठी व शहरातील नागरिकांच्या अडीअडचणीसाठी यापुढे महाराष्ट्र नवनिर्माण जनधिकार सेना काम करेल असा विश्वास सचिन चिखले यांनी व्यक्त केला.

### नियुक्त्या खालील प्रमाणे...

- » अमोल जोशी – शहराध्यक्ष
- » प्रदीप माने – शहर संघटक
- » आकाश भोसले – उपशहराध्यक्ष
- » मंगेश ठाकूर – उपशहराध्यक्ष
- » चेतन चौगुले – उपशहराध्यक्ष
- » पंकज टाक – विभाग अध्यक्ष
- » कल्पेश परमार – विभाग अध्यक्ष
- » यासीन पठाण – विभाग अध्यक्ष

# क्षेत्रभेटीच्या खर्चाचा भार विद्यार्थ्यांच्या खिशावर!

## अधिकचा खर्च विद्यार्थ्यांना परवडणारा नाही

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीच्या खर्चाचा निम्मा भार सहन करावा लागणार आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने या बाबतचा निर्णय घेतला असून, या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी चारुशीला गायके यांनी या संदर्भातील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात शैक्षणिक विभागांना क्षेत्रभेटीसाठी आर्थिक तरतूद करण्यात येते. मात्र विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने क्षेत्रभेटींसंदर्भातील नियमांत सुधारणा केली आहे. त्यानुसार क्षेत्रभेटींसाठी होणाऱ्या एकूण खर्चापैकी ५० टक्के खर्च विद्यार्थ्यांनी करायचा आहे.

तर उर्वरित ५० टक्के खर्च पाच हजार रुपये प्रति विद्यार्थी या कमाल मर्यादेत संबंधित विभागांच्या अर्थसंकल्प क्षेत्रभेट तरतुदीस अधीन राहून मंजूर करण्यात येणार असल्याचे




परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या विभागातील प्राध्यापकांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, काही विभागांकडून विषयांच्या आवश्यकतेनुसार क्षेत्रभेट आयोजित केली जाते. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली असते. अधिकाधिक विद्यार्थ्यांना क्षेत्रभेट घडवण्याची सोय त्याद्वारे होते. त्या क्षेत्रभेटीच्या खर्चात आवश्यकतेनुसार आतापर्यंत विद्यार्थी योगदान देत होते.

> **“राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यात क्षेत्रभेट अनिवार्य झाली आहे. विद्यापीठाच्या शुल्कात वाढ झालेली असताना आता क्षेत्रभेटीच्या खर्चाचा भार विद्यार्थ्यांवर टाकला जाऊ नये. हा अधिकचा खर्च विद्यार्थ्यांना परवडणारा नाही. क्षेत्रभेटीच्या खर्चाचा भार विद्यापीठाने स्वतः करावा. या बाबतचा निर्णय न घेतल्यास आंदोलन करण्यात येईल.**
>
> **-तुकाराम शिंदे,**
> **विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती**

विभागांना क्षेत्रभेट आयोजित करण्याची, विद्यार्थ्यांना क्षेत्रभेटीत सहभागी होण्याची किंवा विद्यार्थ्यांना खर्च करण्याची सक्ती नव्हती. मात्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात क्षेत्रभेट आवश्यक करण्यात आली आहे. त्यासाठी चार श्रेयांकाचा अभ्यासक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला क्षेत्रभेट अनिवार्य आहे. मात्र विद्यापीठाकडून क्षेत्रभेटीचा निम्मा खर्च विद्यार्थ्यांवर टाकण्याची तरतूद नव्यानेच करण्यात आली आहे.

# ‘पीएमपी’त येणार १०० नव्या बस!

## सीएनजीवर धावणार बसेस

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी) लवकरच स्वमालकीच्या शंभर सीएनजी बस घेणार आहे. गुरुवारी संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत याला मान्यता मिळाली असून, पुढील आठवड्यात याच्या निविदा प्रक्रियेलादेखील सुरवात होईल. १२ मीटर लांबीच्या या बस असतील. प्रवाशांच्या सेवेत दाखल होण्यास किमान पाच ते सहा महिन्यांचा अवधी लागण्याची शक्यता आहे. ‘पीएमपी’च्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी पार पडली. सुमारे १५ विषय चर्चेला आले. या वेळी स्वमालकीच्या १०० बस घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. या ‘सीएनजी’वर धावणाऱ्या बस असल्याने त्या उपलब्ध होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. सध्या ई-बसच्या पुरवठ्यासंदर्भात अडचणी येत असून, गेल्या दीड ते दोन वर्षांपासून ‘पीएमपी’ ई-बसच्या




> **“‘पीएमपी’ स्वमालकीच्या १०० बस घेण्याच्या निर्णयाला मंजुरी मिळाली आहे. लवकरच त्याच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात होईल. यासह अन्य काही महत्त्वाचे निर्णय बैठकीत घेण्यात आले.**
>
> **- सचिंद्र प्रताप सिंह,**
> **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपी, पुणे**

प्रतीक्षेत आहे. अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, म्हणून पीएमपी प्रशासनाने ‘सीएनजी’ बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फायदा पीएमपी व प्रवाशांना होणार आहे. प्रवासी संख्येच्या तुलनेत बसची संख्या कमी आहे. त्यामुळे बसची उपलब्धता वाढविणे आता अपरिहार्य आहे, असे या वेळी सांगण्यात आले. ‘पीएमपी’च्या स्वमालकीच्या सध्या ९८१, तर सात ठेकेदारांच्या मिळून १०९८ बस आहेत. नव्या १०० सीएनजी बस दाखल झाल्यावर ‘पीएमपी’च्या स्वमालकीच्या बसची संख्या वाढून १०८१ होईल. यामुळे निश्चितच ताकद वाढणार आहे. ठेकेदारांवरचे अवलंबित्व जेवढे कमी असेल, तेवढाच ‘पीएमपी’ला फायदा होणार आहे. ‘सीएनजी’च्या एका बसमधून दिवसाला सरासरी ७३० प्रवाशांची वाहतूक होते. १०० नव्या बस आल्यावर दिवसाला किमान ७३ हजार प्रवाशांना सेवा मिळेल. यामुळे प्रवासी संख्या वाढेल. विविध मार्गांवरच्या बसमध्ये प्रवाशांना जागेअभावी उभे राहून प्रवास करावा लागतो. मात्र नव्या बसमुळे प्रवासी बसून प्रवास करू शकतील.

# जीएसटी चुकवणे पडले महागात!




**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

खोट्या व बनावट देयकांचा वापर करून व्ही. व्ही. कार्पो रेशनने सव्वा सहा कोटी रुपयांची करचोरी केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी व्ही.व्ही. कॉर्पो रेशनच्या मालकाला अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वस्तू व सेवाकर विभागाच्या अन्वेषण-२ पुणे शाखेने ही कारवाई केली आहे. व्ही. व्ही. कार्पो रेशनचे मालक प्रभाकर वेणू यांनी अस्तित्वात नसलेल्या व फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून खोटी व बनावट देयके प्राप्त करून करचोरी केल्याचे उघडकीस आले आहे. त्यांनी सुमारे ३४ कोटी ८२ लाख रुपयांची प्रत्यक्ष मालाची खरेदी न करता खोटी व बनावट देयके घेऊन ६ कोटी २६ लाख रुपयांची करचोरी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे वेणू यांना महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा २०१७ मधील तरतुदीनुसार आणि अन्वेषणाच्या विशेष कार्यवाही अंतर्गत कलम १३२ (१) (क) अन्वये अटक करण्यात आली आहे. मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालयाने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. वस्तू व सेवाकरचे अतिरिक्त राज्यकर आयुक्त धनंजय आखाडे, राज्यकर सहआयुक्त दीपक भंडारे, राज्यकर उपायुक्त मनिषा गोपाळे-भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकर सहायक आयुक्त भारत सूर्यवंशी, सतिश लंके व सचिन सांगळे आणि राज्यकर निरीक्षकांच्या पथकाने ही कामगिरी केली.

# मुळा-मुठा नदी कामाची गती मंदावली!

## ऑगस्टअखेर केवळ १२ टक्के काम पूर्ण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बंडगार्डन ते मुंढवा या दरम्यानच्या नदी काठ सुधारच्या कामाचा गती मंदावली आहे. ऑगस्टअखेर पर्यंत २० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित असताना केवळ १२ टक्के काम झाले आहे. त्यामुळे आज महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी संबंधित ठेकेदाराचे कान टोचत कामाची गती वाढविण्याचे आदेश दिले आहेत. नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांतर्गत मुळा-मुठा नदीचा काठ सुशोभित केला जाणार आहे.

यामध्ये सध्या संगमवाडी ते बंडगार्डन (३.७ किलोमीटर) आणि बंडगार्डन ते मुंढवा (५.३ किलोमीटर) असा नदी काठ सुशोभित करण्याचे काम सुरु आहे. या कामासाठी अनुक्रमे २६५ कोटी आणि ६०४ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. नदी काठ सुधारचे काम सुरू झाल्यानंतर नेमके हे काम कसे असणार आहे याची कल्पना नागरिकांना यावी यासाठी महापालिकेने बंडगार्डन येथे ३०० मीटर अंतराचे काम प्राधान्याने पूर्ण केले आहे. आयुक्त विक्रम कुमार यांनी आज महापालिकेचे अधिकारी, ठेकेदार यांची महापालिकेत बैठक घेतली. संगमवाडी ते बंडगार्डन या टप्प्याचे काम ३२ टक्के होणे अपेक्षीत होते, तेथे ३० टक्के काम पूर्ण झाले आहे.



पण बंडगार्डन ते मुंढवा या टप्प्याचे काम २० टक्के होणे अपेक्षीत असताना केवळ १२ टक्के काम पूर्ण झाले आहे. संगमवाडी ते बंडगार्डन या कामासाठी सुमारे ४०० कर्मचारी, मजूर रोज कामावर आहेत, पण बंडगार्डन ते मुंढवा दरम्यान केवळ १३० जणांकडून काम करून घेतले जात असल्याचे बैठकीत निदर्शनास आले. त्यावर नाराजी व्यक्त करत आयुक्तांनी मनुष्यबळाची संख्या वाढवून काम वेगात करा, असे आदेश दिले आहेत, असे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी सांगितले. राज्य सरकारने वृक्ष प्राधिकरणाच्या कायद्यात बदल करून वृक्षतोडी संदर्भातील सरकारचा अधिकार महापालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. नदी काठ सुधारच्या कामासाठी झाडे तोडली जाणार असल्याने महापालिकेने त्यासाठी महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे अर्ज केला होता. पण आता कायद्यात बदल केल्याने हे अधिकार पुन्हा महापालिकेला प्राप्त झाले आहेत. त्यामुळे पुढील आठवड्यात या कायद्यातील तरतुदींचे पालन करून आयुक्त विक्रम कुमार हे निर्णय घेणार आहेत. दरम्यान या कामामध्ये सुमारे सात हजार झाडे तोडली जाणार आहेत. त्याबदल्यात महापालिका सुमारे ६० ते ६५ हजार झाडे लावणार आहे, असे खेमनार यांनी सांगितले.

> **‘महापालिका आयुक्तांनी आज नदी काठ सुधार प्रकल्पाच्या कामाचा आढावा घेतला. बंडगार्डन ते मुंढवा टप्प्याचे काम संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे मनुष्यबळामध्ये वाढ करून कामाचा वेग वाढविण्याचे आदेश ठेकेदारास दिले आहेत. नदी सुधार योजनेचा तिसरा टप्पा असलेल्या बाणेर ते वाकड हा आठ किलोमीटरच्या कामासाठी निविदा काढली आहे, पण त्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.’**
>
> **- डॉ. कुणाल खेमनार,**
> **अतिरिक्त आयुक्त, महापालिका**

# अतिक्रमणाची माहिती ’लीक’: डझनभर स्टॉल गायब!

## अतिक्रमण कारवाईला ‘फुटीर’तेचे गालबोट

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** विमाननगर मध्ये मॉल समोर मोक्याची जागा अडवून झालेले अतिक्रमण आणि त्यातून वाढलेल्या गुंडगिरीला चाप लागावा यासाठी पुणे महानगरपालिकेने आज कारवाईचा बडगा उभारला खरा. परंतु कारवाई होणार याची माहिती आधीच ’लीक’ झाल्याने यातील डझनभर बेकायदा स्टॉल रात्रीतूनच गायब करण्यात झाले. त्यामुळे कारवाईला ’फुटीर’तेचे गालबोट लागले. विमाननगरमधील आयटी कंपन्या, मॉल आणि उच्चभ्रू बाजारपेठेमुळे येथे व्यवसायिक जागेला सोन्याची किंमत मोजावी लागते. ही बाब लक्षात आल्यामुळे येथील एका मॉल समोर सुमारे पस्तीस स्टॉल्स उभारण्यात आले होते. त्यातील सुमारे पंचवीस स्टॉल्स बेकायदा होते. स्टॉल्सला लाखो रुपये भाडे मिळत असल्यामुळे आर्थिक वादातून येथे गुंडगिरी सुद्धा वाढली होती. तसेच अतिक्रमन विषयी परिसरातील रहिवाशांच्या तक्रारी होत्या. याची दखल घेत विमाननगरमध्ये कारवाईचा ’सर्जिकल स्ट्राईक’ करण्याचे गुप्त नियोजन नगर रस्ता अतिक्रमण विभागाने केले होते. मात्र येथील बेकायदा स्टॉल धारकांना याची खबर कालच लागली होती. ’टीप’ पक्की असल्याने कारवाईतून वाचण्यासाठी मोठे क्रेन आणून यातील बहुतांशी स्टॉल्स रात्री उशिरा हलवण्यात आले.



कारवाई आधीच स्टॉल हलवल्यामुळे सीसीडी चौक मोकळा झाला. त्यानंतर आज दहा वाजता पुणे महानगरपालिकेने मॉल समोरील जागेवर शिल्लक बेकायदा अतिक्रमणांवर कारवाई सुरू केली.

अतिक्रमण कारवाईची खबर ’लिक’ झालीच कशी असा सवाल काही रहिवासी संघटनांनी सहाय्यक आयुक्तांना विचारला. त्याची दखल घेत जबाबदार सर्व अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस काढण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त सोमनाथ बनकर यांनी लागलीच दिले. विमाननगरमध्ये स्टॉलचे लाखो रुपये भाडे मिळते. त्यातूनच गुंडगिरी वाढली असून एका व्यावसायिकाला धमकी देणाऱ्यांवर पोलिसांनी नुकतीच मोकाची कारवाई केली. तर काही दिवसांपूर्वी सीसीडी चौकातही पान स्टॉलच्या साहित्याची तोडफोड झाली होती. आजच्या कारवाई वेळीही दोन गटांमध्ये शाब्दिक चकमक उडाली.

> **अतिक्रमण कारवाईची माहिती कशी ’लीक’ झाली याची चौकशी करणार आहे. अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याच्या सूचना दिल्या आहेत.**
>
> **- सोमनाथ बनकर,**
> **सहाय्यक आयुक्त, नगर रस्ता क्षेत्रिय कार्यालय.**